## बळीराजाने किटकनाशके वापरताना ध्यावयाची काळजी

डॉ. अनिल आडे
संचालक
आत्मनिर्भर बळीराजा कृषी व्यवसाय प्रा. लि., पुणे



- किटकनाशके नेहमी काळजीपूर्वक हाताळावीत.
- किटकनाशकाची वाहतूक खाद्यवस्तूंबरोबर, बियाण्याबरोबर किंवा प्रवाशांबरोबर करू नये, ती स्वतंत्ररीत्या किंवा खताबरोबर करावी.
- किटकनाशके थंड व कोरड्या ठिकाणी, नेहमी कडी-कुलपात, लहान मुलांपासून, पाळीव प्राण्यांपासून व राहण्याच्या खोलीत न ठेवता दूर ठेवावीत.
- किटकनाशकांचे रिकामे डबे / बाटल्या यांची विल्हेवाट योग्यप्रकारे लावावी.
- किटकनाशके ही कागदी किंवा जाड पुठ्ठ्याचे पॅकेट, प्लॅस्टिक किंवा धातूचे डबे / बाटल्या यांमध्ये उपलब्ध असतात, वापरून झाल्यावर रिकामे डबे / बाटल्या यांचा वापर पाणी पिण्यासाठी, अन्नपदार्थ किंवा जनावरांचे खाद्य ठेवण्यासाठी करू नये.
- तसेच ते शेतातही इतस्ततः पडू देऊ नये, कारण त्यामुळे लहान मुले, जनावरे, पाळीव प्राणी यांना धोका पोचू शकतो, त्यासाठी कागदी पुठ्ठ्याचे पॅकेट कापून त्याचे तुकडे करावेत व ते जमिनीत गाडावे.
- रिकामे डबे / बाटल्या पाण्याने स्वच्छ धुऊन त्यांना छिद्रे पाडून, ठोकून ती पसरट करावीत व नंतर ती जमिनीत गाडून टाकावीत.
- रिकाम्या पोटी फवारणी करू नये.
- किटकनाशके वापरतांना खाऊ, पिऊ किंवा धुम्रपान करू नये.
- पिण्याआधी किंवा खाण्यापुर्वी हात व चेहरा धुवावा.
- किटकनाशक फवारणी नेहमी वा-याच्या दिशेने करावी.
- किटकनाशके शरीरावर पडणार नाही याची काळजी घ्यावी.

(संपर्क: +९१ ९५५२८०४६०४)

★ ★ ★

## बळीराजाने खते व किटकनाशके खरेदी करताना ध्यावयाची काळजी

डॉ. अनिल आडे
संचालक
आत्मनिर्भर बळीराजा कृषी व्यवसाय प्रा. लि., पुणे

खते व किटकनाशके यांच्या गुणवत्ता व दर्जावरच शेतीचे यशापयश पूर्णपणे अवलंबून असते. योग्य गुणवत्ता व दर्जाच्या कृषी निविष्ठांअभावी मशागत व निविष्ठांवर केलेला खर्च पूर्णपणे वाया जाऊ शकतो. तेव्हा बळीराजाने खते व किटकनाशके खरेदी शिफारसीप्रमाणे परवानाधारक विक्रेत्यांकडूनच करावी.



### खते खरेदी करताना ध्यावयाची काळजी:

- रासायनिक खते खरेदी करताना परवानाधारक विक्रेत्याकडूनच खरेदी करावीत.
- विक्रेत्याकडून खरेदी केलेल्या रासायनिक खताची रोखीची अथवा उधारीची पावती मागून घ्यावी.
- खरेदी पावतीवर खताचे नाव, ग्रेड, किंमत व उत्पादकाचे नाव यांचा उल्लेख असणे अत्यंत आवश्यक आहे.
- खात्री करूनच बिलावर सही करावी.
- खत खरेदी करीत असताना खताच्या पोत्याच्या वजनाची खात्री करून घ्यावी.
- खते विक्री किमतीच्या जादा दराने विक्री होत असल्यास त्वरित नजीकच्या कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा.

### किटकनाशके खरेदी करताना ध्यावयाची काळजी:

- किटकनाशकांची खरेदी परवानाधारक विक्रेत्यांकडूनच करावी.
- किटकनाशके खरेदी करताना ती सीलबंद पॅकिंगमध्ये असल्याची खात्री करून घ्यावी.
- किटकनाशके खरेदी करताना खरेदी केलेल्या कीटकनाशकांची रोख अथवा उधारीची पावती घ्यावी.
- किटकनाशके खरेदी करताना पावतीवर किटकनाशकाचे नाव, उत्पादकाचे नाव, बॅच क्रमांक, वापराची अंतिम तारीख यांचा उल्लेख असणे अत्यंत आवश्यक आहे.
- खात्री करूनच पावतीवर स्वाक्षरी करावी.
- किटकनाशके विक्री किमतीच्या जादा दराने विक्री होत असल्यास त्वरित नजीकच्या कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा.

(संपर्क: +९१ ९५५२८०४६०४)

★ ★ ★